# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, गडचिरोली
दिनांक : ०५/०२/२०१९

## गडचिरोली मध्ये ३० व्या रस्ता सुरक्षा सप्ताह अभियानाचे उद्‌घाटन

३० व्या रस्ता सुरक्षा सप्ताह अभियानाच्या निमित्ताने वाहतुक शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गडचिरोली यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे दिनांक - ०४/०२/२०१९ रोजी रस्ता सुरक्षा सप्ताह उद्‌घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. जिल्हाधिकारी शेखर सिंह यांनी भुषविले तसेच कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांचे हस्ते पार पडले. मा. जिल्हाधिकारी शेखर सिंह यांनी आपल्या भाषणात रस्ते अपघात होण्यास रस्त्याची दुरावस्था, वाहन चालकांस वाहतुकीचे अपुर्ण ज्ञान असणे अशा बऱ्याच गोष्टी कारणीभुत असुन आजची तरुण पीढी चित्रपटातील दृश्य पाहुन वाहन चालवितांना आढळते. यामुळे रस्ते अपघाताचे प्रमाण वाढले आहे असे जिल्हाधिकारी सा. यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले. आणि मा. पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी आपल्या भाषणात वाहन चालवितांना प्रत्येकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे, वाहनांचे अदयावत कागदपत्रे, लायसन्स याबाबत प्रत्येकाने जागरुक असले पाहीजे. रस्ता सुरक्षा हा अतिशय गंभीर प्रश्न असुन याबाबत प्रत्येक व्यक्तिनी संवेदनशिल असले पाहीजे. विशेषतः १८ वर्षाखालील अल्पवयीन मुलांनी वाहन चालवु नये. तसेच प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवुन वाहतुक करु नये असे आवाहन वाहन चालकास करण्यात आले. तसेच दुचाकी वाहन चालकांनी हेल्मेटचा वापर करणे अत्यावश्यक असुन प्रथमतः शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यापासुन हेल्मेटचा वापर करण्याची सुरवात होणे अत्यावश्यक आहे. असे मा.पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी गडचिरोली विशाल ढुमे, कार्यकारी अभियंता विवेक मिश्रा, म.रा.प.मं. गडचिरोली विभाग नियंत्रक वाडीभस्मे उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमाला गडचिरोलीतील महिला महाविद्यालय, शिवाजी महाविद्यालय, कृषी महाविद्यालयाचे शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी ॲटो/टॅक्सी युनियन अध्यक्ष, सदस्य तसेच उपप्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी तसेच कर्मचारी, वाहतुक शाखा अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन राजेश वटपल्लीवार यांनी केले असून आभार प्रदर्शन महिला पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मी तांबुसकर, यांनी केले.